शुक्रवार, दि. १५ मे २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २५३ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जनसेवाहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## संभाजी महाराज जन्मोत्सवात इतिहास, शौर्य आणि स्वाभिमानाचा जागर





**संभाजी महाराजांच्या विचारांनी जीवन अलौकिक होते : वंदना मगरे**

**'धर्मवीर' नाव घेताच अंगात दहा हत्तींचे बळ येते : अक्षय गोरंट्याल**

**महाराजांना एका चौकटीत बांधणे अशक्य : अरविंद देशमुख**

**शिवशाहीरांच्या आवाजाने शिवप्रेमी भारावले**

**जालना मनपाकडून महापुरुषांच्या पुतळ्यांचे सुशोभीकरण होणार**

जालना । प्रतिनिधी - धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव समितीच्या वतीने जालना शहरातील छत्रपती संभाजी राजे स्मारक परिसरात गुरुवार दि. १४ मे रोजी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा जन्मोत्सव अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. शिवप्रेमींच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. इतिहास, शौर्य, स्वाभिमान आणि हिंदवी स्वराज्याच्या विचारांचा जागर घडवून आणणारा हा सोहळा जालनाकरांसाठी प्रेरणादायी ठरला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जालना महानगरपालिकेच्या आयुक्त अंजली शर्मा यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याला दुग्धाभिषेक करण्यात आला. त्यानंतर महाराष्ट्रातील प्रसिद्ध शिवशाहीर अरविंद घोगरे यांनी आपल्या दमदार आणि पहाडी आवाजात छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा पराक्रमी इतिहास उलगडून सांगितला. त्यांच्या ओजस्वी सादरीकरणामुळे उपस्थित शिवभक्त भारावून गेले होते. ''जय भवानी, जय शिवाजी''च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला.

यावेळी बोलताना जालना शहराच्या महापौर वंदना मगरे म्हणाल्या की, छत्रपती संभाजी महाराजांच्या नावातच 'धर्मवीर' आहे. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संभाजी महाराज हे आपल्या समाजाचे आराध्य दैवत आहेत. त्यांच्या विचारांचा आदर्श घेतल्यास समाज अधिक सुसंस्कृत आणि प्रेरणादायी बनेल. जालना महानगरपालिकेच्या माध्यमातून शहरातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्यांचे सुशोभीकरण आणि नूतनीकरण करण्यात येणार असून शहराच्या सौंदर्यकरणात मोठी भर घालण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून खासदार डॉ. कल्याण काळे, उपमहापौर राजेश राऊत, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव आंबेकर, युवा नेते अक्षय गोरंट्याल, उद्योजक घनशामदास गोयल, गणेश सुपारकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, महापालिकेच्या आयुक्त अंजली शर्मा, उपायुक्त सुप्रिया चव्हाण, श्रीमती जाधव, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, नगरसेवक सिद्धिविनायक मुळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच समितीचे मार्गदर्शक अरविंद देशमुख, अशोक पडूळ, स्वागताध्यक्ष प्रा. राजेंद्र जाधव, अध्यक्ष रामेश्वर ढोबळे, सागर पाटील, महेश नागवे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी युवा नेते तथा नगरसेवक अक्षय गोरंट्याल यांनी आपल्या भाषणात तरुणाईला प्रेरणा देणारा संदेश दिला. ते म्हणाले की, आजच्या काळात कृत्रिम ऊर्जा देणाऱ्या एनर्जी ड्रिंक्सची गरज नाही; केवळ 'धर्मवीर संभाजी महाराज' हे नाव उच्चारले तरी अंगात दहा हत्तींचे बळ संचारते. आगामी काळात जालना महानगरपालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शिवकालीन शस्त्रविद्या जसे दांडपट्टा आणि तलवारबाजीचे प्रशिक्षण सक्तीचे करण्याचा ठराव मांडला जाणार असल्याची घोषणाही त्यांनी केली.

प्रास्ताविकपर भाषणात अरविंद देशमुख यांनी संभाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकताना सांगितले की, अनेकांनी संभाजी महाराजांना वेगवेगळ्या नावांनी संबोधले असले तरी त्यांना कोणत्याही एका चौकटीत बंदिस्त करणे शक्य नाही. ज्यांनी आपल्या रक्ताचा शेवटचा थेंब सांडून स्वराज्याचे रक्षण केले ते 'स्वराज्यरक्षक' आहेत आणि ज्यांनी अमानुष छळ सहन करूनही धर्म व स्वाभिमानाचा त्याग केला नाही ते 'धर्मवीर' देखील आहेत. त्यामुळे संभाजी महाराज हे स्वराज्यरक्षक आणि धर्मवीर या दोन्ही पदव्या सार्थ ठरवणारे महान व्यक्तिमत्त्व असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

स्वागताध्यक्ष प्रा. राजेंद्र जाधव यांनी संभाजी महाराजांचे जीवन म्हणजे शौर्य, त्याग आणि असीम धैर्याचा प्रेरणादायी इतिहास असल्याचे सांगितले. हा जन्मोत्सव केवळ धार्मिक किंवा सांस्कृतिक कार्यक्रम नसून जालन्यातील प्रत्येक शिवभक्ताच्या मनातील आदरांजली असल्याचे त्यांनी नमूद केले.

जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष रामेश्वर ढोबळे यांनी सांगितले की, संभाजी महाराजांचा इतिहास केवळ पुस्तकांपुरता मर्यादित न राहता तो समाजकार्यातून जिवंत राहावा, या उद्देशाने यंदा 'शंभू सप्ताह' आयोजित करण्यात आला होता. या सप्ताहात विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि जनजागृतीपर उपक्रम राबवून समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचे काम समितीने केले असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला किशोर मरकड, माजी नगरसेवक बाबुराव पवार, सुजित जोगस, सुनील साळवे, सुधाकर रत्नपारखे, शिवराज नारियलवाले, संजय देठे, प्रा. राजेंद्र भोसले, कारभारी मसलेकर, पंकज जऱ्हाड, संदीप ताडगे, वंजारी सेवा संघाचे प्रदेश कार्याध्यक्ष देवेंद्र बारगजे, मातंग मुक्ती सेनेचे संस्थापक अशोक साबळे, उद्धव पवार, लक्ष्मण नेव्हाल, कास्ट्राईब संघटनेचे जगन्नाथ खानवटे, संजय हेरकर, राऊ युवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्रीपाद रत्नपारखे, प्रा. चंद्रशेन कोठावळे, राजेंद्र गोरे, संतोष गाजरे, श्री. आबुज, जगन्नाथ शिंदे यांच्यासह जन्मोत्सव समितीचे योगेश पाटील, जोतीराम माने, योगेश सोळंके, किशोर कांबळे, योगेश पवार, बालासाहेब कोकणे, प्रभुदास केदारे, संजय जाधव, चंद्रकांत पोकळे, ॲड. शैलेश देशमुख, किरण शिरसाठ आदींसह शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र जाधव आणि अशोक पडूळ यांनी केले, तर आभार प्रदर्शन जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष रामेश्वर ढोबळे यांनी मानले.

### युवा पिढीला महापुरुषांच्या विचारांची ऊर्जा मिळणे आवश्यक-आंबेकर

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव आंबेकर यांनी आयोजकांच्या कार्याचे कौतुक करताना सामाजिक जबाबदारीवर भर दिला. ते म्हणाले की, अरविंद देशमुख आणि त्यांची संपूर्ण टीम केवळ उत्सव साजरा करत नाही, तर क्रीडा, सामाजिक आणि आंदोलनाच्या माध्यमातून सामान्यांचे प्रश्न मांडण्याचे काम सातत्याने करत असते. आजच्या धावपळीच्या युगात युवा पिढी भरकटत असताना, त्यांना छत्रपती संभाजी महाराजांसारख्या महापुरुषांचे विचार हीच खरी ऊर्जा देऊ शकतात. महाराजांचा धगधगता इतिहास तरुणांच्या रक्तात सळसळला पाहिजे, जेणेकरून ते अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी सक्षम होतील. अशा भव्य जन्मोत्सवाच्या माध्यमातूनच शिव-शंभू विचारांची मशाल घराघरात पोहोचण्यास मदत होत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

### संभाजी महाराजांचे बलिदान हाच लोकशाहीचा पाया-अनंत कुलकर्णी

उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात छत्रपती संभाजी महाराजांच्या कर्तृत्वाचा गौरव केला. ते म्हणाले की, महाराजांनी आपल्या अवघ्या नऊ वर्षांच्या कार्यकाळात एकाच वेळी नऊ शत्रूंशी लढा देऊन स्वराज्य सुरक्षित राखले. आज आपण ज्या लोकशाहीचा आणि स्वातंत्र्याचा उपभोग घेत आहोत, त्याची मुहूर्तमेढ छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांनी रचलेली आहे. युवकांनी केवळ जयजयकार न करता महाराजांच्या ज्ञानाचा वारसा जपला पाहिजे. संभाजी महाराज हे केवळ योद्धे नव्हते तर ते उत्तम साहित्यिकही होते, त्यामुळे तरुणांनी त्यांचे बुधभूषण सारखे ग्रंथ वाचून त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा आणि व्यसनांपासून दूर राहून राष्ट्रकार्यात योगदान द्यावे.

---

जनगणना-२०२७ च्या पहिल्या टप्प्यासाठी प्रशासन सज्ज

## घरयादी व घरगणनेच्या क्षेत्रीय कामांना गती; प्रशिक्षण, नियोजन आणि प्रसिद्धीवर भर

**जालना । प्रतिनिधी -** केंद्र शासनाने जनगणना अधिनियम १९४८ अंतर्गत देशव्यापी जनगणना-२०२७ जाहीर केल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय, जालना (जनगणना विभाग) यांनी यासंदर्भात परिपत्रक जारी करून जनगणना-२०२७ च्या पहिल्या टप्प्यातील घर यादी व घर गणनेच्या क्षेत्रीय कामांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक सूचना दिल्या आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयातून प्रसिद्ध करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार, स्वगणनेचा कालावधी दि. १ मे, २०२६ते दि. १५ मे, २०२६ दरम्यान राहणार असून, प्रत्यक्ष क्षेत्रीय कामकाज दि. १६ मे, २०२६ ते दि. १४ जून, २०२६ या कालावधीत पार पाडले जाणार आहे. या प्रक्रिये दरम्यान नागरिकांच्या घरांची, कुटुंबांची तसेच विविध सामाजिक व मूलभूत माहितीची नोंद केली जाणार आहे.

या कामासाठी प्रशासनाने जनगणना अधिकाऱ्यांची नियुक्ती, सामान्य जनतेची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या यासंदर्भातील वैधानिक अधिसूचना प्रसिद्ध केल्याचेही परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय, घर यादी व घर गणने दरम्यान विचारण्यात येणारे ३३ प्रश्न अधिसूचित करण्यात आले आहेत. जनगणनेची प्रक्रिया सुरळीत आणि अचूक पार पडावी यासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांना फील्ड ट्रेनरमार्फत प्रशिक्षण देण्यात आले असून, प्रशिक्षण साखळीतील अंतिम टप्प्यातील प्रगणक व पर्यवेक्षकांचे प्रशिक्षणही पूर्ण झाल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. जिल्हास्तरावरील प्रशासकीय संरचना मजबूत करण्याबरोबरच प्रत्येक प्रशासकीय घटकात घर यादी गट तयार करण्याचे कामही पूर्णत्वाकडे आले असुन, यामध्ये परिपत्रकात पुढील महत्त्वाच्या बाबींवर विशेष भर देण्यात आला आहे. यात

आवश्यक प्रगणक व पर्यवेक्षकांची नियुक्ती करून २३ एप्रिल ते ८ मे,२०२६ दरम्यान त्यांचे प्रशिक्षण आयोजन करणे.

सर्व घरयादी गटांना क्षेत्रीय कामांचे वाटप करून १६ मे, २०२६ पासून प्रत्यक्ष कामास सुरुवात करणे. आणि १४ जून, २०२६ पर्यंत क्षेत्रीय काम पूर्ण करण्यासाठी काटेकोर नियोजन करणे.

घरयादी, घरगणना तसेच स्व-गणनेबाबत व्यापक प्रसिद्धी करून नागरिकांमध्ये जनजागृती करणे.

१ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या स्व-गणनेसंदर्भातील आवश्यक व्यवस्था करणे.

प्रशासनाने क्षेत्रीय कामकाजात डिजिटल साधनांचा **पान २ वर**

## जालना महापालिकेचा अतिक्रमण हटावचा धडाका; पाच दिवसांत १३३ दुकाने भुईसपाट




**जालना । प्रतिनिधी -** जालना शहराला अतिक्रमणमुक्त करण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने सुरू केलेली विशेष मोहीम पाचव्या दिवशीही जोमाने सुरू राहिली. आज, १४ मे २०२६ रोजी उड्डाणपूल ते घाटी रोड परिसरातील अवैध बांधकामांवर महापालिकेचा हातोडा पडला. गेल्या पाच दिवसांच्या या धडक कारवाईत शहराच्या विविध भागांतील तब्बल १३३ दुकानांचे अतिक्रमण हटवून रस्ते आणि भूमिगत गटारे मोकळी करण्यात आली आहेत.

आजची कारवाई: चिकन-मटण विक्रीची १७ दुकाने हटवली
गुरुवारी प्रशासनाने उड्डाणपूल ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा (नूतन वसाहत), अंबड चौफुली आणि घाटी रोड परिसरावर लक्ष केंद्रित केले. या भागात रस्त्यावर अनधिकृतपणे थाटलेली चिकन-मटण विक्रीची १७ दुकाने आणि शेड, तसेच इतर २० अशी एकूण **३७ अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली. जेसीबीच्या सहाय्याने ही पक्की बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली.

पाच दिवसांचा लेखाजोखा
११ मे पासून सुरू झालेल्या या मोहिमेत आतापर्यंत एकूण १३३ ठिकाणचे ओटे, रस्त्यावरील वाढीव बांधकामे, सिमेंटचे ढापे, पायऱ्या आणि दुकानांवरील पत्रे हटवण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, नाल्यांवरील अनधिकृत फरशा हटवून भूमिगत गटारांमधील सांडपाण्याचा मार्ग मोकळा करण्याला प्रशासनाने प्राधान्य दिले आहे.

प्रशासकीय यंत्रणा आणि पोलीस बंदोबस्त
महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा यांच्या आदेशाने आणि उपायुक्त त्र्यंबक कांबळे. यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली. या मोहिमेत: यंत्रसामुग्री २ जेसीबी, २ **पान २ वर**

संपादकीय पान

## जागतिक अर्थसहाय्याच्या दिशेने जालना

जालना शहरातील पाणीपुरवठा, भुयारी गटार आणि सांडपाणी व्यवस्थापन या मूलभूत प्रश्नांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना आता महत्त्वाचे वळण मिळताना दिसत आहे. जालना शहर सुधारित पाणी पुरवठा योजना, भुयारी गटार योजना आणि सांडपाणी पुनर्वापर प्रकल्पांचा जागतिक बँक अर्थसहाय्य यादीत समावेश व्हावा, यासाठी राज्य शासन स्तरावर सुरू असलेल्या पाठपुराव्याच्या पार्श्वभूमीवर तज्ञ अधिकाऱ्यांच्या पथकाने जालना शहरात येऊन प्रत्यक्ष पाहणी केली, ही निश्चितच सकारात्मक बाब मानावी लागेल. कोणत्याही शहराच्या विकासाचा पाया हा पाणी, स्वच्छता आणि सांडपाणी व्यवस्थापन या नागरी सुविधांवर उभा असतो. जालना शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असताना जुन्या पायाभूत सुविधा कालबाह्य होत चालल्या आहेत. अनेक भागांमध्ये अपुरा पाणीपुरवठा, गटारांच्या समस्या आणि सांडपाण्याच्या अयोग्य व्यवस्थापनामुळे नागरिकांना दररोज त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या तिन्ही योजनांचा जागतिक बँकेच्या अर्थसहाय्य यादीत समावेश होणे म्हणजे केवळ निधी मिळवण्याचा विषय नसून जालना शहराच्या भविष्यातील शाश्वत विकासाशी संबंधित महत्त्वाचा टप्पा आहे. या संदर्भात भाजपाचे वरिष्ठ नेते, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, माजी मंत्री बबनराव लोणीकर, आमदार नारायणराव कुचे, संतोष दानवे आणि माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा राजकीय इच्छाशक्तीचे उदाहरण म्हणून पाहता येईल. विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मागणीची तत्काळ दखल घेत तज्ञ पथक पाठविण्याचा निर्णय घेतला, यावरून राज्य शासन या विषयाकडे गांभीर्याने पाहत असल्याचे स्पष्ट होते. मात्र, येथे एक गोष्ट लक्षात घेणे अत्यंत आवश्यक आहे सर्वेक्षण आणि पाहणी हा केवळ प्रारंभिक टप्पा असतो; खरी परीक्षा अंमलबजावणीत असते. देशात अनेक शहरांमध्ये जागतिक बँक किंवा केंद्र शासनाच्या निधीतून मोठे प्रकल्प मंजूर झाले, पण वेळेत कामे पूर्ण न होणे, वाढीव खर्च, निकृष्ट दर्जा आणि भ्रष्टाचारामुळे अनेक योजना नागरिकांसाठी डोकेदुखी ठरल्या आहेत. जालन्याने या चुका टाळणे गरजेचे आहे. विशेष म्हणजे, नव्याने स्थापन झालेल्या महानगरपालिकांना १० टक्के स्थानिक हिस्सा भरण्याची अट शिथिल करून राज्य शासनाने मोठा दिलासा दिला आहे. आर्थिकदृष्ट्या मर्यादित क्षमतेच्या जालना महानगरपालिकेसाठी हा निर्णय महत्त्वाचा आहे. त्यामुळे प्रकल्पाचा संपूर्ण आर्थिक भार शासन उचलणार असल्यास जालना मनपाला आर्थिक श्वास घेण्याची संधी मिळू शकते. परंतु निधी शासन देत असला तरी प्रकल्पांची गुणवत्ता, पारदर्शकता आणि दीर्घकालीन उपयोगिता यावर स्थानिक प्रशासनाची जबाबदारी अधिक वाढते. आज जालना शहराला केवळ विकासाच्या घोषणा नकोत, तर परिणामकारक अंमलबजावणी हवी आहे. पाणीपुरवठा योजना मंजूर होऊनही नळ कोरडे राहिले, गटार योजना सुरू होऊन रस्ते वर्षानुवर्षे खोदलेले राहिले किंवा सांडपाणी प्रकल्प फक्त कागदावरच राहिले, तर नागरिकांचा विश्वास पुन्हा डळमळीत होईल. त्यामुळे या योजनांच्या प्रत्येक टप्प्यावर तांत्रिक पारदर्शकता, वेळेचे नियोजन आणि लोकप्रतिनिधींसह नागरिकांचा सहभाग आवश्यक ठरणार आहे. जागतिक बँकेसारख्या संस्थांचे अर्थसहाय्य मिळणे हे शहराच्या विश्वासार्हतेचे प्रतीक मानले जाते. त्यामुळे जालन्यासाठी ही केवळ आर्थिक मदत नसून भविष्यातील स्मार्ट आणि शाश्वत शहराच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल ठरू शकते. आता अपेक्षा एवढीच की, राजकीय पाठपुरावा आणि प्रशासकीय हालचाली यांचे रूपांतर प्रत्यक्ष, दर्जेदार आणि जनहिताच्या विकासकामांत व्हावे.


# भारताचे रक्षण, सर्वांगीण अभिवृद्धी आणि लोककल्याणार्थ - राजमातंगी महायज्ञ

यज्ञ हे सनातन सनातन संस्कृतीचे एक महत्त्वाचे अंग आहे. धर्मग्रंथांत वर्णिलेल्या यज्ञांचा लाभ समाजाला मिळावा, यासाठी काही संत प्रयत्नरत आहेत. संतांच्या अथक प्रयत्नांमुळेच यज्ञ संस्कृती टिकून आहे. विश्वकल्याणासाठी यज्ञयाग करण्याची आपली परंपरा आहे. सध्या तिसऱ्या महायुद्धाचे सावट संपूर्ण जगावर आहे. जरी राजकीय, बौद्धिक स्तरावर प्रयत्न होत असले, तरी आध्यात्मिक पाठबळ हे खूप महत्त्वाचे आहे आणि म्हणूनच मुंबई येथे श्री राजमातंगी महायज्ञाचे आयोजन सनातन संस्थेच्या वतीने केले आहे, या निमित्ताने लेखप्रपंच !

यज्ञ संस्कृतीः भारतीय संस्कृतीत यज्ञाला ब्रह्मांडाची नाभी मानले जाते. म्हणजेच यज्ञ हा सृष्टीचा केंद्रबिंदू आहे आणि त्यामुळेच वैदिक काळापासून यज्ञांना विशेष महत्व दिले आहे. एकूणच या यज्ञांच्या माध्यमातून देवतांचे आशीर्वाद प्राप्त करून इच्छित ध्येय साध्य करणे सुलभ होते. राजसूय, अश्वमेध, पुत्रकामेष्टी आदी यज्ञांविषयी सविस्तर माहिती हिंदू धर्मग्रंथांत आढळते. यज्ञातील अग्नी आणि मंत्रांच्या उच्चाराने वातावरणातील नकारात्मकता दूर केली जाते. यज्ञाच्या माध्यमातून वातावरणाचे संतुलन राखले जाते आणि त्याची शुद्धी होत असते. यज्ञाचा पर्यावरणावर, तसेच मानवजातीवर पुष्कळ सकारात्मक परिणाम होतो, हे आता वैज्ञानिक संशोधनातूनही समोर आले आहे.

सनातनच्या आश्रमात आतापर्यंत रामराज्याच्या स्थापनेसाठी आणि समाजाच्या कल्याणासाठी ३०० हून अधिक यज्ञ आणि १,००० हून अधिक धार्मिक विधी केले आहेत. यामध्ये साग्निचित् अश्वमेध महासोमयाग, उच्छिष्ट गणपति यज्ञ, चंडीयाग, धन्वंतरि याग, संजीवनी होम, पंचमहाभूत याग आदी यागांचा समावेश आहे. या यज्ञयागांचा संकल्प धर्मकार्यात येणारे अडथळ्यांचे निवारण व्हावे तसेच रामराज्यरूपी हिंदु राष्ट्राची स्थापना व्हावी, असा समष्टीच्या कल्याणाचा होता. मे २०२५ मध्ये गोवा येथे झालेल्या सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवात भारताच्या रक्षणासाठी अन् विजयासाठी शतचंडी यज्ञ आणि अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी 'श्री महाधन्वन्तरि याग' आयोजित करण्यात आला. या वेळी देशविदेशातील संत-महंत यांच्यासह ३० हजारांहून अधिक भाविक आणि हिंदू धर्मप्रेमींची उपस्थिती होती.





श्री राजमातंगी देवीचे कार्य आणि महायज्ञाचे प्रयोजन ! : आदिशक्ति देवी सतीच्या क्रोधातून निर्माण झालेली शक्तीची दहा रूपे म्हणजे दशमहाविद्या! काली, तारा, षोडशी, भुवनेश्वरी, त्रिपुरभैरवी, छिन्नमस्ता, धूमावती, बगलामुखी, मातंगी आणि कमला या दशमहाविद्या आहेत. मातंगी आदिशक्तिची प्रधानमंत्री (सल्लागार) असल्याने तिला श्री राजमातंगी असे म्हटले जाते. या देवीच्या उपासनेने शत्रूवर नियंत्रण प्राप्त होत असल्याने सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीत तपोभूमी भारताचे रक्षण होण्यासाठी श्री राजमातंगीदेवीचे संरक्षककवच आवश्यक आहे. श्रीविष्णूच्या विविध दशावतारांच्या वेळीही दशमहाविद्या कार्यरत असतात. त्रेतायुगात श्रीरामाच्या अवताराच्या वेळी श्री राजमातंगीदेवीचे तत्त्व कार्यरत होते; म्हणून आदर्श रामराज्य स्थापन झाले ! सद्यस्थितीतही रामराज्याच्या निर्मितीसाठी श्रीराजमातंगी देवीची कृपा आवश्यक आहे !

राजमातंगी ही विजयप्रदा आहे. सध्याच्या युद्धकाळात तपोभूमी भारताला संरक्षक कवच लाभावे आणि भारताची सर्वांगीण अभिवृद्धी व्हावी; म्हणून सनातन संस्थेने श्री राजमातंगी महायज्ञ आयोजित केला आहे. या वेळी श्री राजमातंगीदेवीची स्तुती करून भारताचा सर्वांगीण विकास आणि रक्षण यांसाठी सामूहिक प्रार्थना करण्यात येईल ! सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांनी धर्मकार्याचा आरंभ केला, त्या मुंबादेवीच्या नगरीत आयोजित हा महायज्ञ म्हणजे रामराज्य निर्मितीच्या दिशेने उचललेले ऐतिहासिक पाऊलच ! या यज्ञाचा आध्यात्मिक लाभ आपण सपरिवार उपस्थित राहून अवश्य घ्यावा, ही विनंती !

स्थळ : नर्दुल्ला टँक मैदान, श्री सिद्धिविनायक मंदिराच्या मागे, प्रभादेवी, मुंबई.
दिनांक : रविवार, १७ मे २०२६,
वेळ : दु. ३.३० ते सायं.७.३० वा.
संपर्क क्र.: ७२०८१३०८३०

**संकलक : श्री. अभय वर्तक,**
**प्रवक्ता, सनातन संस्था**

### तीव्र उष्णतेच्या पार्श्वभूमीवर अंगणवाडी बालकांना सुट्टी देण्याची आयोगाची शिफारस

# पोषण आहाराची पर्यायी व्यवस्था करा; बालहक्क संरक्षण आयोगाचे महिला व बालकल्याण विभागाला निर्देश

### बालहक्क संरक्षण आयोगाचे सदस्य डॉ. संजय लाखे पाटील यांची माहिती

**जालना । प्रतिनिधी -** राज्यभरात एप्रिल आणि मे महिन्यात वाढलेल्या तीव्र उष्णतेच्या पार्श्वभूमीवर अंगणवाडीतील बालकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून, महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाने याची गंभीर दखल घेतली आहे. अंगणवाडीतील बालकांना उष्माघाताचा धोका टाळण्यासाठी किमान एक महिन्याची सुट्टी जाहीर करण्यात यावी, तसेच पोषण आहारासाठी पर्यायी व्यवस्था करण्याचे वैधानिक निर्देश आयोगाने आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांना दिले आहेत. अशी माहिती बालहक्क संरक्षण आयोगाचे सदस्य डॉ. संजय लाखेपाटील यांनी दिली.

या संदर्भात माहिती देताना डॉ. संजय लाखे पाटील म्हणाले की, राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये तापमानाने विक्रमी पातळी गाठली असून, प्रशासनाकडून नागरिकांना आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. अशा परिस्थितीत अंगणवाडीतील लहान बालकांच्या आरोग्याच्या सुरक्षेचा मुद्दा अधिक गंभीर बनला आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाने २७ एप्रिल २०२६ रोजी पत्राद्वारे महिला व बालविकास विभागाकडे अहवाल मागविला होता. तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पोषण आहार प्रीमिक्स स्वरूपात देण्याबाबतही विचारणा करण्यात आली होती. मात्र आयोगाच्या वारंवार पत्रव्यवहार आणि स्मरणपत्रांनंतरही संबंधित विभागाकडून अहवाल सादर करण्यात आलेला नाही. ३० एप्रिल २०२६ रोजी आयोगाच्या बैठकीत आयुक्त कार्यालयाच्या वतीने उपस्थित उपायुक्त श्री. क्षिरसागर यांना बालकांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक माहिती सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. आयोगाने पत्रव्यवहारात तातडीने असा स्पष्ट उल्लेख करूनही प्रशासनाकडून दिरंगाई झाल्याने आयोगाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. दरवर्षी मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांना उन्हाळी सुट्ट्या जाहीर होतात. मात्र याला अपवाद ठरतात ते अंगणवाडीतील बालक. वास्तवात शाळांना सुट्टी लागल्यानंतर अनेक कुटुंबे नातेवाईकांकडे स्थलांतर करतात आणि मोठ्या भावंडांसोबत अंगणवाडीतील मुलेही गावाबाहेर जातात. त्यामुळे अंगणवाडीतील पोषण आहाराचे उद्दिष्ट देखील प्रभावीपणे पूर्ण होत नसल्याचे आयोगाने निदर्शनास आणले आहे. १२ मे २०२६ रोजी आयोगाचे अध्यक्ष श्री. संजय पुराणिक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत सदस्य डॉ. संजय लाखेपाटील, श्रीमती गीतांजली बुटी, श्रीमती तांबट, श्रीमती मिलन जंगम, श्री. प्रवीण बुजाडे, सचिव श्री. पंकज देवरे () आणि प्रशासकीय अधिकारी श्रीमती वंदना जैन उपस्थित होते. या बैठकीत आयोगाने आपल्या अधिकारांचा वापर करत पुढील वैधानिक निर्देश जारी केले.

**आयोगाचे महत्त्वाचे निर्देश...!**

राज्यातील वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर अंगणवाडीतील बालकांना किमान एक महिन्याची सुट्टी देण्यात यावी. सुट्टीच्या कालावधीत बालकांच्या पोषण आहारासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पर्यायी व्यवस्था करण्यात यावी. टेक होम रेशन स्वरूपातील प्रीमिक्स पॅकेटद्वारे पोषण आहार उपलब्ध करून देण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा. आयोगाच्या शिफारशींवर विभागाने घेतलेल्या निर्णयाचा सविस्तर लेखी अहवाल आठ दिवसांत सादर करावा. याबाबतची माहिती महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे सदस्य डॉ. संजय लाखेपाटील यांनी दिली.

### महाराष्ट्रात मतदार याद्यांची विशेष सखोल पुनरिक्षण मोहिम

# ९.८६ कोटी मतदारांच्या घरी पोहोचणार निवडणूक यंत्रणा

**मुंबई -** भारत निवडणूक आयोगाने देशातील १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये विशेष सखोल पुनरिक्षण () मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर केला आहे. या मोहिमेत महाराष्ट्राचा समावेश असून, राज्यातील सुमारे ९ कोटी ८६ लाख मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे.

बीएलओच्या प्रत्यक्ष घरांना भेटी

महाराष्ट्रात विशेष सखोल पुनरिक्षण मोहीम अत्यंत व्यापक स्वरूपात राबवण्यात येणार आहे. यात राज्यातील एकूण ९,८६,४४,४१३ मतदारांच्या तपशिलाची खातरजमा मतदान केंद्रस्तरीय अधिका-यांमार्फत ()नियुक्त करण्यात येणार आहे. हे अधिकारी प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन माहिती गोळा करतील. या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी राजकीय पक्षांतर्फे नेमण्यात आलेले बूथ लेव्हल एजंट्स () त्यांना सहकार्य करणार आहेत.

जनगणनेच्या कामाशी सांगड

सध्या सुरू असलेल्या जनगणनेच्या कामात व्यस्त असलेल्या क्षेत्रीय यंत्रणेचा विचार करून या तिसऱ्या टप्प्याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील ही प्रक्रिया जून महिन्यापासून सुरू होऊन ऑक्टोबरमध्ये पूर्ण होईल.

महाराष्ट्रासाठीचे महत्त्वाचे वेळापत्रक:

दिनांक २० ते २९ जून २०२६ या कालावधील बीएलओ यांना प्रशिक्षण आणि पूर्वतयारी करण्यात येईल. त्यानंतर ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत घरोघरी जाऊन भेटी देण्यात येतील. ५ ऑगस्ट २०२६ रोजी मसुदा मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल तसेच ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती नोंदविता येतील आणि ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादीची प्रसिद्ध करण्यात येईल.

राजकीय पक्षांना आवाहन

भारत निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्षांना प्रत्येक मतदान केंद्रावर आपले एजंट () नियुक्त करण्याचे आवाहन केले आहे. यामुळे मतदार यादीतून दुबार नावे तसेच मृत व्यक्तींची नावे काढणे आणि नवीन पात्र मतदारांची नोंदणी करणे ही प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि अचूक होण्यास मदत होणार आहे.

# जालना जिल्हा क्रीडा कार्यालयातर्फे विविध खेळांच्या उन्हाळी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जालना यांच्या वतीने जिल्ह्यातील विद्यार्थ्यांमध्ये खेळाविषयी आवड निर्माण होऊन शारीरिक क्षमता व कौशल्य विकास व्हावा या उद्देशाने विविध खेळांच्या मोफत उन्हाळी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरांमध्ये जिम्नॅस्टिक, रायफल शूटिंग, तलवारबाजी, खो-खो, लॉन टेनिस, सॉफ्ट टेनिस, ज्युदो, टेनिक्वाईट, नेटबॉल, सॉफ्ट टक्का, आर्चरी, सॉफ्टबॉल आणि बेसबॉल या खेळांचा समावेश करण्यात आला आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात खेळांचा प्रचार व प्रसार होऊन अधिकाधिक विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. विशेषतः ८ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व शारीरिक क्षमतेच्या विकासासाठी प्राथमिक कौशल्य विकास प्रशिक्षणावर भर देण्यात येणार आहे.

ही प्रशिक्षण शिबिरे दि. १९ मे ते ३० मे, २०२६ या कालावधीत सकाळी ६.३० ते ९.०० आणि सायंकाळी ५.०० ते ७.०० या वेळेत आयोजित करण्यात आली आहेत. जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी या शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी केले आहे.

शिबिरासाठी विविध खेळांचे प्रशिक्षक नियुक्त करण्यात आले असून विद्यार्थ्यांना तज्ज्ञ मार्गदर्शन मिळणार आहे. जिम्नॅस्टिकसाठी सिद्धेश कदम, रायफल शूटिंगसाठी आशिष जांगडे, तलवारबाजीसाठी विजय गाडेकर, खो-खोसाठी सचिन मोहिते, लॉन टेनिस आणि सॉफ्टटेनिस साठी विकास काळे, ज्युदोसाठी अमोल मोहिते, टेनिक्वाईटसाठी शेख चाँद पी.जे., आर्चरीसाठी सचिन टेकुर तसेच सॉफ्टबॉल आणि बेसबॉलसाठी एकनाथ सुरशे हे प्रशिक्षक म्हणून कार्यरत राहणार आहेत.

प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल, जालना येथे करण्यात आले असून काही खेळांचे प्रशिक्षण शिशु विहार इंग्लिश स्कूलजवळील मैदान, रामचंद्र सांस्कृतिक क्रीडा मंडळ, सी.पी. कॉलेज परिसर तसेच ज्ञानसागर विद्यालय, सिपोरा अंबोरा (ता. जाफ्राबाद) येथे होणार आहे. शिबिरात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी संबंधित क्रीडा मार्गदर्शकांशी संपर्क साधून नाव नोंदणी करावी व दि. १९ मे रोजी सकाळी ६.३० वाजता उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी, जालना यांनी केले आहे.

पान १ वरुन

## घरयादी व ...

प्रभावी वापर करण्यावरही भर दिला असून, सर्व संबंधित विभागांनी वेळेत समन्वय साधून काम केल्यास जनगणना प्रक्रियेत कोणतीही अडचण येणार नसल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. जनगणना-२०२७ ही देशाच्या लोकसंख्येची, सामाजिक रचनेची आणि विकास आराखड्याची महत्त्वपूर्ण आधारभूत माहिती ठरणार असल्याचे जिल्हा प्रशासन, जालना यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## जालना महापालिकेचा ...

टिप्पर आणि ३ ट्रॅक्टरचा वापर.

अधिकारी: सहाय्यक आयुक्त विजय फुलंब्रीकर, अतिक्रमण विभाग प्रमुख बी. सी. राठोड, सॅमसन कसबे आणि स्वच्छता निरीक्षक अरुण वानखेडे यांच्यासह ४० ते ५० कर्मचाऱ्यांचा ताफा तैनात होता.

सुरक्षा:जालना पोलीस प्रशासनाच्या चोख बंदोबस्तामुळे मोहिमेत कोणताही अडथळा निर्माण झाला नाही.

प्रशासनाचा इशारा:

''ही मोहीम केवळ विशिष्ट भागापुरती मर्यादित नसून संपूर्ण शहरात राबवली जाणार आहे. येणाऱ्या काळात कारवाई अधिक तीव्र होईल, त्यामुळे अतिक्रमणधारकांनी स्वतःहून आपली अनधिकृत बांधकामे हटवून घ्यावीत.''

महानगरपालिका प्रशासन, जालना.

नगरसेवक शशिकांत घुगे यांच्या मागणीला अखेर यश

# अंबड रोडवरील २५ ते ३० मटन-चिकन दुकाने हटवली

**जालना । प्रतिनिधी** - शहरातील अंबड रोड परिसरातील नूतन वसाहत भागात असलेली मटन व चिकनची दुकाने हटविण्याच्या मागणीला अखेर यश आले असून जालना महानगरपालिकेने मोठी कारवाई करत तब्बल २५ ते ३० दुकाने हटवली आहेत. नगरसेवक शशिकांत घुगे यांनी केलेल्या आंदोलनानंतर प्रशासनाने ही कारवाई केल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

या मागणीसाठी नगरसेवक शशिकांत घुगे यांनी १ मे रोजी महाराष्ट्र दिनाच्या मुहूर्तावर जालना महानगरपालिकेसमोर एकदिवसीय आमरण उपोषण सुरू केले होते. अंबड रोडवरील नूतन वसाहत परिसरात वाढलेल्या मोकाट कुत्र्यांच्या उपद्रवामुळे नागरिक त्रस्त झाले होते. परिसरातील मटन-चिकन दुकानांमुळे अस्वच्छता वाढून मोकाट कुत्र्यांची संख्या वाढत असल्याचा आरोप करण्यात येत होता. काही दिवसांपूर्वी अनेक लहान मुलांना मोकाट कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

उपोषणादरम्यान दुपारी चार वाजण्याच्या सुमारास जालना महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त सुप्रिया चव्हाण व सहाय्यक आयुक्त विजय महाराज फुलंब्रीकर यांनी उपोषणस्थळी भेट देत शशिकांत घुगे यांना उपोषण मागे घेण्याची विनंती केली. मात्र, ''जोपर्यंत दुकाने हटविण्याबाबत ठोस निर्णय होत नाही, तोपर्यंत मागे हटणार नाही,'' अशी आक्रमक भूमिका घुगे यांनी घेतली होती.

यानंतर सहाय्यक आयुक्त सुप्रिया चव्हाण यांनी महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला. आयुक्तांनी स्वतः उपोषणकर्त्यांशी संवाद साधत पंधरा दिवसांच्या आत संबंधित दुकाने हटविण्याची तसेच मोकाट कुत्र्यांच्या समस्येवर लवकर उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्या मध्यस्थीनंतर हे उपोषण मागे घेण्यात आले होते.

दरम्यान, दिलेल्या आश्वासनानुसार पंधरा दिवसांनंतर आज जालना महानगरपालिकेने अंबड रोडवरील नूतन वसाहत भागात कारवाई करत २५ ते ३० मटन-चिकन दुकाने हटवली. या कारवाईवेळी आयुक्त अंजली शर्मा, सहाय्यक आयुक्त विजय महाराज फुलंब्रीकर, उपायुक्त त्र्यंबक कांबळे, अतिक्रमण विभागाचे प्रमुख कसबे, बी.सी. अंभोरे यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## नूतनवसाहत परिसरातील अतिक्रमण हटविल्यानंतर आयुक्त अंजली शर्मा यांचा सत्कार

महानगरपालिकेच्या या कारवाईमुळे परिसरातील स्वच्छता आणि मोकाट कुत्र्यांच्या समस्येवर काही प्रमाणात नियंत्रण मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. तसेच नगरसेवक शशिकांत घुगे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच ही कारवाई शक्य झाल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

**नूतनवसाहत परिसरातील अतिक्रमण हटविल्यानंतर आयुक्त अंजली शर्मा यांचा सत्कार**

जालना शहरातील नूतनवसाहत परिसरातील मच्छी मार्केट, मटण व चिकन दुकाने तसेच गरीब शाह बाजार आणि बस स्थानक परिसरातील अतिक्रमण हटविण्याची कारवाई महानगरपालिकेकडून करण्यात आल्याने भाजपच्या नगरसेवकांच्या वतीने जालना महानगरपालिकेच्या आयुक्त अंजली शर्मा यांचा सत्कार करण्यात आला.

महानगरपालिकेच्या वतीने शहरातील अतिक्रमण हटाव मोहिमेला वेग देण्यात आला असून आयुक्त अंजली शर्मा या स्वतः घटनास्थळी उपस्थित राहून पाहणी करत आहेत. नूतनवसाहत भागातील मच्छी मार्केट, मटण व चिकन दुकाने हटविण्याची कारवाई तसेच गरीब शाह बाजार आणि स्थानक परिसरातील अतिक्रमण हटविण्यामुळे नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर भाजपच्या नगरसेवकांनी आयुक्त अंजली शर्मा यांचा सत्कार करून त्यांच्या कारवाईचे स्वागत केले. शहरातील स्वच्छता, वाहतूक आणि नागरिकांच्या सुविधांसाठी सुरू असलेल्या मोहिमेला भाजप नगरसेवकांचा पूर्ण पाठिंबा असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी सभागृह नेते महेश निकम, नगरसेवक शशिकांत घुगे, आनंद झारखंडे, शिवराज नारळवाले, सुहास मुंडे आदी उपस्थित होते.

# मनपा शासन-प्रशासनाकडून दिव्यांगांचे प्रश्न जैसे थे; राहुल मुळे यांचा आरोप

**जालना । प्रतिनिधी** - महानगरपालिकेत नवीन आयुक्त,आजली शर्मा महापौर वदना मगरे व उपमहापौर राजेश राऊत आल्यानंतरही शहरातील दिव्यांगांच्या समस्या कायम असल्याचा गंभीर आरोप सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे यांनी केला आहे.

शहरातील दिव्यांग नागरिकांना ५० टक्के घरकुल, पाणीपट्टीत सवलत, दरमहा मानधन योजना सुरू करणे तसेच घरकुलासाठी जागा उपलब्ध करून देण्यात यावी, अशा विविध मागण्यांसाठी दिव्यांग बांधवांनी वेळोवेळी आंदोलने, मोर्चे आणि निवेदने दिली असल्याचे त्यांनी सांगितले.

महापौर, वंदना मगरे उपमहापौर राजेश राऊत आणि नवीन आयुक्त यांची प्रत्यक्ष भेट घेऊनही दिव्यांगांच्या प्रश्नांवर कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याची खंत राहुल मुळे यांनी व्यक्त केली.

तसेच, मुंबई येथील नगर सचिवालयातील एका अधिकाऱ्याने उपायुक्त त्र्यंबक कांबळे यांना दूरध्वनी करून राहुल मुळे हे वारंवार मुंबईत येऊन दिव्यांगांच्या प्रश्नांसाठी पाठपुरावा करत असल्याची माहिती दिली होती. दिव्यांगांना मानधन योजना सुरू करण्यासाठी लक्ष घालावे, अशी सूचनाही संबंधित अधिकाऱ्यांनी केल्याचे मुळे यांनी सांगितले. मात्र, त्यानंतरही प्रशासनाने या विषयाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. दिव्यांगांच्या प्रश्नांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अन्यथा पुढील काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिव्यांग संघटनांच्या वतीने देण्यात आला आहे.

## दिव्यांगांचे प्रश्न सोडवण्यासाठी सर्वपक्षीय नेते एकत्र यावेत - राहुल मुळे



जालना शहरातील दिव्यांगांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी शिवसेना आमदार अर्जुनराव खोतकर, माजी आमदार कैलास गोरंट्याल, भाजपचे महानगराध्यक्ष भास्कर दानवे यांनी एकत्रित येऊन पुढाकार घ्यावा, अशी मागणी सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे यांनी केली आहे. दिव्यांगांना मानधन योजना, घरकुल, पाणीपट्टी सवलत तसेच इतर मूलभूत सुविधा मिळाव्यात यासाठी वारंवार पाठपुरावा करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, आमदार अर्जुनराव खोतकर, माजी आमदार कैलास गोरंट्याल, भाजप महानगराध्यक्ष भास्कर दानवे तसेच नवीन आयुक्त अंजली शर्मा यांच्याकडे अनेकदा निवेदने देऊनही दिव्यांगांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप राहुल मुळे यांनी केला आहे. दिव्यांगांच्या प्रश्नांवर प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा पुढील काळात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला

# जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केली मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्त्यांची पाहणी

**जालना । प्रतिनिधी** - राज्य शासनाच्या ''मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ता योजना'' अंतर्गत जिल्ह्यातील शेत व पाणंद रस्त्यांची कामे नियोजनबद्ध आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण व्हावीत, यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज जालना व घनसावंगी तालुक्यातील विविध गावांमध्ये प्रस्तावित शेत/पाणंद रस्त्यांच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. यामध्ये जालना तालुक्यातील लोंढ्याचीवाडी तसेच घनसावंगी तालुक्यातील राणी उचेंगाव, राजेगाव, वडीरामसगाव आणि बाचेगाव येथील प्रस्तावित शेत/पाणंद रस्त्यांची त्यांनी पाहणी केली. यावेळी संबंधित महसूल अधिकाऱ्यांकडून प्रस्तावित रस्त्यांची सविस्तर माहिती घेतली. पाहणीदरम्यान रस्त्यांची उपलब्ध जागा, अतिक्रमण स्थिती, मोजणी प्रक्रिया, तांत्रिक बाबी तसेच कामांच्या अंमलबजावणीचा आढावा जिल्हाधिकारी यांनी घेतला.

मेरखेडा येथे खरीप हंगाम पूर्व तयारी व शेतकरी मार्गदर्शन मेळावा संपन्न

# उत्पादन वाढीसाठी बीजप्रक्रिया आणि हुमणी व्यवस्थापन काळाची गरज - आर. डी. मालवी



**दत्ता देशमुख**

**जाफराबाद** - तालुक्यातील मेरखेडा येथे कृषी विभागाच्या वतीने आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात शेतकऱ्यांना खरीप पूर्व तयारी, बियाणे निवड आणि सुधारित तंत्रज्ञानाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. श्री अमोल शिंदे तालुका कृषी अधिकारी व अनिल शेळके मंडळ कृषी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली श्री आर डी मालवी सहाय्यक कृषी अधिकारी यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधताना सांगितले की, ''हवामान बदलाच्या काळात शेती फायदेशीर करायची असेल, तर केवळ पारंपरिक पद्धतीवर अवलंबून न राहता तांत्रिक बाबींची जोड देणे आवश्यक आहे. विशेषतः सोयाबीन पिकाची पेरणी करताना घरच्याच बियाण्याला प्राधान्य द्यावे आणि त्याची उगवण क्षमता तपासूनच पेरणी करावी.''

मार्गदर्शनातील महत्त्वाचे मुद्दे:

बीजप्रक्रिया मोहीम: मर रोग आणि खोडमाशीच्या नियंत्रणासाठी एफ.आय.आर. (बुरशीनाशक, कीटकनाशक व जिवाणू खते) पद्धतीने बीजप्रक्रिया करण्याचे आवाहन करण्यात आले.

हुमणी अळी नियंत्रण: पावसाच्या पहिल्या सरीनंतर प्रकाश सापळे लावणे आणि यजमान झाडांवरील भुंगेरे नष्ट करणे यावर भर देण्यात आला.

खत व्यवस्थापन: जमिनीचा पोत ओळखून संतुलित खतांचा वापर करावा आणि अनावश्यक खर्च टाळावा, अशा सूचना श्री. मालवी यांनी दिल्या.

पेरणीची घाई नको: जमिनीत किमान ७५ ते १०० मि.मी. पाऊस झाल्याशिवाय आणि पुरेशी ओल असल्याशिवाय पेरणी करू नये, असा मोलाचा सल्ला यावेळी देण्यात आला.

या मेळाव्याला मेरखेडा परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी शेतकऱ्यांच्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले.

# छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादन

**जालना । प्रतिनिधी** - छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, मनीषा दांडगे, सुकेशनी पगारे यांच्यासह तुषार निकम, सतीश तायडे, रवी मगरे, संपदा कुलकर्णी, शिल्पा मगरे, प्रशासकीय इमारतीमधील अधिकारी, कर्मचाऱ्यांनीही पुष्प अर्पण करुन छत्रपती संभाजी



महाराज यांना अभिवादन केले.

## जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख जालना यांचे कार्यालय

**प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, जालना ४३१ २०३**

**दुरध्वनी** : ०२४८२- २२५६८४ **ईमेल** - dslrjalna@yahoo.com

**क्र.न.भू/ अपील/एस.आर.५५०/२०२५ दिनांक : ०६/०५/२०२६**

## जाहीर नोटीस

प्रति,

१. शोभा अनिल गिते
रा. लोणार गल्ली, ता. पुरंदर सासवड, पुणे.

२. पुष्पा एकनाथ मुळेकर
रा. लक्ष्मीनारायणपुरा जालना.

३. वंदना गोरखनाथ कुऱ्हे
रा. बालाजी नगर, सायखेडा रोड, नाशिक

**.... अपिलार्थी**

**विरुद्ध**

१) सत्यकुमार काशीनाथ करंडे १अ) मंगलबाई सत्यकुमार करंडे २) लक्ष्मण काशीनाथ करंडे ३) जनार्धन काशीनाथ करंडे (मयत)
वारस अ) नंदा जनार्धन करंडे ब) पुरा समाधान आजगे क) रोहीत जनार्धन करंडे
४) हिरालाल लक्ष्मण जाधव ५) सौ. वच्छलाबाई उत्तमराव वाघमारे ६) शंभुअप्पा भाऊअप्पा गवळी
७) करीम पोपटभाई भारवानी ८) मिखलासिंग लखासिंग औलख ९) अरविंद साहेबराव भांदरगे
१०) काकासाहेब पंडीतराव जराळ ११) रामाअप्पा भाऊअप्पा १२) संतुअप्पा नाथाअप्पा
१३) श्रीमती जिजाबाई १४) सौ. पिंटूबाई दिगांबरराव भारवार
१५) काशिनाथ महिपतराव करंडे - दि. ०५/०२/२०२६ चे पुरशिसने वगळले)
१६) श्रीमती सुवर्णकौर मिलखासिंग औलक १७) सितारासिंग मिलखासिंग औलक १८) बलजिसिंग मिलखासिंग औलक
१९) मंगलसिंग मिलखासिंग औलक २०) सुनिल उत्तमराव मोहिते २१) नंदकिशोर धोंडीराम चिलका
२२) पंढरीनाथ धोंडीराम चिलका २३) कैलास धोंडीराम चिलका २४) सटवाजी भुमैय्या सिरमल
२५) लक्ष्मीनारायण दिगंबरराव मारवार २६) मदन उत्तमराव पतंगे २७) श्रीमती सुनिता मनोहर पाऊलबुदे
२८) सुरेश हनुमंत सैबी २९) लक्ष्मण किसनराव गुटूंक ३०) बबन सुर्दशन लक्क्म
३१) सौ. संगीता मदन अन्नलदास ३२) तेजेनद्रसिंग दलजितसिंग चौहार ३३) सौ. मिरा विजय मेहेत्रे
३४) सौ. अनुराधा राधेशाम राऊत ३५) दादाराम माणिकराव पाचफुले ३६) तान्हासिंग उत्तमसिंग पाटोळे
३७) संजय दगडू टिपरास ३८) सौ. निर्मला भिका वाघमारे ३९) सौ. निर्मला भिका वाघमारे
४०) मंगल कन्हैयालाल गारे ४१) निर्मला आत्माराम पैठणकर ४२) ओमप्रकाश विजयप्रकाश जैस्वाल
४३) रमेश विजयप्रकाश जैस्वाल ४४) रत्नमाला हरिलाल शाहू ४५) किरणमाला गोपीचंद जैस्वाल
४६) छाया चंद्रप्रकाश जैस्वाल ४७) श्रीमती लिलाबाई सुरेश जैस्वाल
४८) राजेश विजयप्रकाश जैस्वाल उर्फ पापालाल शाहू ४९) सुशील रत्नाकर देशपांडे
अ.क्र. १ ते ३ अ.ब.क. सर्व रा. आनंद निवास समोर, मधुबन कॉलनी, सिंगल जिन जुना जालना ता. जि. जालना.
अ.क्र. ४ ते ४९ सर्व रा. नभूक्र. ९६४५, जालना ता. जि. जालना. **.... गैर अपिलार्थी**

**विषय : मौजे शहर जालना ता. जि. जालना येथील नभूक्र. ४८९५ मधील फेरफार क्र. १९ दिनांक १०/०६/१९९४ व फेरफार क्र ८६९८३ दिनांक ०५/१२/१९२३ व रद्द करणे बाबत अपील अर्ज.**

मौजे शहर जालना ता. जि. जालना येथील नभूक्र. ४८९५ मधिल फेरफार क्र. १९ दिनांक १०/०६/१९९४ व फेरफार क्र. ४६९८३ दिनांक ०५/१२/१९२३ व रद्द करणे बाबत अपिलदार शोभा अनिल गिते व इतर यांनी इकडील कार्यालयात अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिल प्रकरणात इकडील कार्यालयामार्फत रजिस्टर पोस्टाने नोटीस पाठविलेल्या असतांना जाबदार क्र. २ ते १४ व १६ ते ४९ यांना सुनावणी नोटीस रुजू झाली नाही तसेच सदर जाबदार हे सुनावणी कामी हजर नाही व त्यांचा लेखी युक्तीवादही सादर केलेला नाही. त्या अनुषंगाने दिनांक २६/०२/२०२६ चे सुनावणीचे वेळी वृत्तपत्रातून जाहीर प्रगटन प्रसिद्ध देणेची अपिलदार यांची विनंती मान्य करणेत आली.

सबब या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, विषयात नमुद मिळकती बाबतच्या अपील प्रकरणात निर्णय घेणे करीता इकडील कार्यालयात दिनांक ११/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणी घेणेत येणार आहे. तरी जाबदार यांनी किंवा या मिळकतीच्या संदर्भात कोणाचा काही हित संबंध असल्यास स्वतः किंवा कायदेशीर प्रतिनिधी मार्फत सुनावणी वेळी हजर राहून मिळकतीच्या कागदपत्र व पुराव्यासह आपली बाजु मांडण्यासाठी सदर सुनावणी कामी हजर राहावे व गैरहजर राहिल्यास आपले काहीही म्हणणे नाही असे समजुन प्रकरणात एकतर्फी सुनावणी घेण्यात येवून प्रकरणामध्ये नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सुनावणीचे ठिकाण : जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना यांचे कार्यालय.**

**सुनावणीची दिनांक : ११/०६/२०२६ वेळ : सकाळी ११.०० वाजता.**

**(एम.पी. मगर)**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख,**
**जालना**

# हातवण बृहत लघु प्रकल्प व दुधना नदीवरील को.प. बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रूपांतराला गती

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यासाठी महत्त्वाचे ठरणारे हातवण बृहत लघु प्रकल्प तसेच दुधना नदीवरील को.प. बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रूपांतर या दोन महत्त्वपूर्ण प्रकल्पांसंदर्भात आज मंत्रालयात जलसंपदा मंत्री मा. नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक पार पडली. ही बैठक आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या विशेष आग्रहास्तव आयोजित करण्यात आली होती.

बैठकीत हातवण बृहत लघु प्रकल्पाच्या भूसंपादन प्रक्रियेबाबत तसेच दुधना नदीवरील को.प. बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रूपांतर करण्यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. दोन्ही प्रकल्प तातडीने मार्गी लावण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आल्याची माहिती आमदार अर्जुन खोतकर यांनी दिली.

यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी हातवण बृहत लघु प्रकल्पासाठी भूसंपादन प्रक्रिया तातडीने राबविण्यासाठी सुमार १५० कोटी रुपयांची आवश्यकता असल्याचे मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले. त्यावर येणाऱ्या अधिवेशन काळात पुरवणी मागण्यांमधून १५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात येईल तसेच पुढील तीन महिन्यांत भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

तसेच संबंधित विभागांनी या

### आमदार अर्जुन खोतकर म्हणाले...

''हातवण बृहत लघु प्रकल्प व दुधना नदीवरील बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रूपांतर हे जालना जिल्ह्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे प्रकल्प आहेत. अनेक दिवसांपासून मी सातत्याने या संदर्भात पाठपुरावा करत होतो. आजच्या बैठकीत सकारात्मक निर्णय झाल्याने हे दोन्ही प्रकल्प निश्चितच लवकर मार्गी लागतील. या मध्ये ७१४.१५ हेक्टर जमीन संपादित होणार असून जवळपास ५००० एकर जमीन ओलिताखाली येणार आहे व गोलापांगरी, बठाण ,गाडे सावरगाव, माली पिंपळगाव, कारला ,करडगाव,चितळी पुतळी आदी को.प. बंधाऱ्याचे बॅरिजेस मध्ये रूपांतर होऊन यामध्ये देखील मोठ्या प्रमाणावर शेती सिंचनाखाली येणार आहे .शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न सुटून परिसराच्या विकासाला मोठी चालना मिळेल.''र

### आमदार अर्जुन खोतकर यांच्या पाठपुराव्याला यश; दोन्ही प्रकल्पांना हिरवा कंदील

दोन्ही कामाच आजपासूनच प्रस्ताव तयार करण्याच्या कामाला लागावे, अशा सूचनाही मंत्री महोदयांनी अधिकाऱ्यांना दिल्या. त्यामुळे शेतकरी व नागरिकांना लवकरच भूसंपादनाची रक्कम मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

बैठकीला जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार अर्जुनराव खोतकर (ऑनलाईन), व्यवस्थापकीय संचालक गोदावरी पाटबंधारे मंडळ, मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता भारत शेंडगे, कार्यकारी अभियंता वानखेडे, कृषी अधिकारी, भूसंपादन विभागाचे अधिकारी तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

दीर्घकाळापासून या दोन्ही प्रकल्पांसाठी सातत्याने पाठपुरावा करत असल्याचे सांगताना आमदार अर्जुन खोतकर म्हणाले की, ''या बैठकीमुळे दोन्ही प्रकल्पांना हिरवा कंदील मिळाला असून लवकरच हे स्वप्न प्रत्यक्षात उतरणार आहे.''






# जिल्हा परिषद शिक्षक पतसंस्थेचे रिक्त पदासाठी चुरस निर्माण

## संचालकाचे सहाय्यक निबंधकास पत्र

**दत्ता देशमुख**

**जाफराबाद -** तालुका जिल्हा परिषद शिक्षक पतसंस्थेचे रिक्त पद नियमबाह्य पद्धतीने भरण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. यासाठी संचालक मंडळाची बैठक बोलावून त्यातून हे पद भरण्याचे मनसुबे सत्ताधारी पक्षाने सुरू केले आहे. दरम्यान रिक्त झालेले हे पद नियमबाह्य पद्धतीने न भरता सहकारी पतसंस्था अधिनियमाच्या अधीन राहून भरावे अशी मागणी एका लेखी निवेदनाद्वारे पतसंस्थेतील विरोधी पक्षाच्या सहा संचालकासह जाफराबाद तालुका शिक्षक हक्क संघर्ष समितीने एआर कडे केली आहे. याबाबत बुधवारी सहाय्यक निबंधक जाफराबाद यांना दिलेल्या लेखी निवेदनात संचालकांनी म्हटले आहे की सध्या पतसंस्थेच्या निवडणुकीला केवळ दीड वर्षाचा कालावधी राहिला असताना हे रिक्त पद भरण्याची गरजच काय. शिवाय जर रिक्त पद भरायचेच असेल तर ते पण संचालकांच्या बैठकीत भरणे नियमबाह्य आहे त्यासाठी सभासदातून निवडणूक घेऊन हे पद भरले जावे. कारण एका संचालकाच्या मृत्यूमुळे रिक्त झालेले हे पद यापूर्वी निवडणुकी द्वारेच भरले गेलेले आहे. त्यासाठी पुन्हा निवडणूक घेणे गरजेचे आहे असेही या संचालकांनी निवेदनात म्हटले आहे.

दरम्यान एकतर दीड वर्षासाठी हे रिक्त पद भरूच नये. भरावयाचे असल्यास सभासदातून भरले जावे. शिवाय संचालक पद भरण्यासाठी आयोजित सभेसाठी काढण्यात आलेली नोटीसही संचालकांना विहित मुदतीत दिलेली नाही. असा आरोपही या संचालकांनी केला



आहे. निवेदनावर पतसंस्थेचे माजी चेअरमन तथा विद्यमान संचालक सुखदेव अवकाळे, संचालक संजय निकम, सुनिता खलसे, गणेश फुकट, अभिजीत साळवे, किरण तिडके, यांच्यासह जाफराबाद तालुका शिक्षक हक्क संघर्ष समितीचे तालुकाध्यक्ष नसीम शेख यांची स्वाक्षरी आहे.

चौकट- जानेवारी २३ मध्ये निवडणूक झालेल्या जाफराबाद तालुका जि.प. शिक्षक पतसंस्था निवडणुकीत सत्ताधारी पॅनलच्या सात तर विरोधी पॅनलच्या सहा जागा निवडून आल्या होत्या. त्यात पतसंस्थेचे माजी चेअरमन तथा विद्यमान संचालक विनोद कळंबे यांचे दीड महिन्यापूर्वी अपघाती निधन झाल्याने एक पद रिक्त झाले आहे. त्यानुसार आता दोन्ही गटाकडे ६-६ इतके समान बहुमत आहे. यामुळे बहुमताची जादुई फिगर पूर्ण करण्यासाठी या एका जागेला विशेष महत्त्व आल्याने भर उन्हाळ्यात यानिमित्ताने शिक्षक पतसंस्थेचे राजकारण पुन्हा एकदा तापताना दिसत आहे.

# स्वातंत्र सैनिक कुटुंब कल्याण आर्थिक विकास महामंडळ स्थापन करा- बाबासाहेब कोलते

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्रातील स्वातंत्र सैनिकांना व त्यांच्या वारसाचे मुलामुलीचे, नातवांचे प्रश्न शासन दरबारी मांडण्यासाठी स्वातंत्र सैनिक कुटुंब कल्याण आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची मागणी स्वातंत्र सैनिक पाल्य युवक समितीचे प्रदेश अध्यक्ष बाबासाहेब पाटील कोलते यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांना पाठविलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, महाराष्ट्रामध्ये आतापर्यंत राज्यशासनाचे व केंद्रशासनाचे मिळून जवळपास १७ हजारापेक्षा अधिक स्वातंत्र्य सैनिक व वारस पत्नी असून आज रोजी जवळपास ५ हजाराहून अधिक स्वातंत्र्य सैनिक व वारस पत्नी निवृत्ती वेतन घेत आहेत. परंतु मयात झालेल्या स्वातंत्र्य सैनिक व त्याच्या कुटुंबातील वारस मुला-मुलींना स्वातंत्र्यसैनिकांच्या कार्याची आठवण राहावी व स्वातंत्र्य सैनिकाच्या वारसाचे / पाल्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ''स्वातंत्र्य सैनिक कुटुंब कल्याण आर्थिक विकास महामंडळ'' स्थापन करावे स्वातंत्र्य सैनिक व नामनिर्देशित पाल्यांचे व वारसांचे अनेक प्रश्न शासन दरबारी प्रलंबित असून आजरोजी नामनिर्देशित व्यक्तींना १९९१ च्या शासन निर्णयाप्रमाणे शासन सेवेत समावून घेण्यात यावे तसेच स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्या वारसांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी स्वातंत्र्य सैनिक कुटुंब कल्याण आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणे अत्यंत गरजेचे आहे.



भाजपा महायुती सरकार ने महाराष्ट्र राज्यामध्ये विविध समाजासाठी जवळपास ५२ हून अधिक आर्थिक विकास महामंडळ. त्यांच्या कार्यकाळात स्थापन केल्यामुळे अनेक समाजाचे व आर्थिक दुर्बल घटकांचे व वंचितांचे प्रश्न महामंडळाच्या माध्यमातून सोडविण्यात शासनाची मदत होत आहे. त्यामुळे आता महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिकाच्या कुटुंबाचे व त्यांच्या वारसाचे मुला-मुलींचे / नातवाचे प्रश्न सोडविण्यासाठी व स्वातंत्र्य सैनिकाच्या कुटुंबाला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने स्वातंत्र्य सैनिक कुटुंब कल्याण आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांना व पाल्यांना न्याय द्यावा अशी मागणी बाबासाहेब कोलते यांनी केली आहे.

# शिक्षक मुमताज अली खान यांना जीवन गौरव पुरस्कार

**दत्ता देशमुख**

**जाफराबाद -** येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक मुमताज अली खान यांना यावर्षीचा जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. सामाजिक, शैक्षणिक, आध्यात्मिक, साहित्यिक, राष्ट्रीय व्यक्तिमत्व विकास आदी क्षेत्रात त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

साहित्यधारा सेवा भावी संस्था आणि विश्वरत्न फाउंडेशनतर्फे दिला गेलेला हा पुरस्कार छत्रपती संभाजी नगर येथील डॉ.आंबेडकर विधी महाविद्यालयात आयोजित एका विशेष समारंभात त्यांना बहाल करण्यात आला. यावेळी पुणे विभागाचे उपायुक्त



आत्माराम धाबे, मुंबईच्या शिक्षण मंत्रालयाच्या प्रथम सचिव डॉ. मेघना, मिस नागपूर आदींची मंचावर उपस्थिती होती.

या पुरस्काराबद्दल बझम डेक्कन उर्दू चे संस्थापक अध्यक्ष डॉ.सलीम नवाज हशर जाफराबादी, जमाते इस्लामी हिंद चे जिल्हाध्यक्ष सय्यद शाकीर, शेख रिजवान, नगरसेवक शेख तालेब, शेख नसीम आदींसह मित्रपरिवाराने त्यांचे कौतुक केले आहे.

### पोल्ट्री फार्म निवासी क्षेत्राजवळ चालवण्यास मनाई, नागरिकांचे आरोग्य महत्त्वाचे

# हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल; महाराष्ट्रानेही धडा घ्यावा - ॲड. महेश धन्नावत

**जालना । प्रतिनिधी -** निवासी क्षेत्रापासून ५०० मीटरच्या आत कोणताही पोल्ट्री फार्म (कुक्कुटपालन केंद्र) चालवता येणार नाही, मग त्यात ५,००० पेक्षा कमी पक्षी असले तरीही, असा महत्त्वपूर्ण आणि दूरगामी परिणाम करणारा निकाल हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायमूर्ती अजय मोहन गोयल यांच्या एकलपीठाने कांगडा जिल्ह्यातील निवासी घरांपासून केवळ ५०-६० मीटर अंतरावर असलेल्या एका पोल्ट्री फार्मला तात्काळ बंद करण्याचे आदेश दिले. ''नागरिकांना स्वच्छ, आरोग्यदायी आणि सुरक्षित वातावरणात जगण्याचा अधिकार हा भारतीय संविधानाच्या कलम २१ नुसार एक अंमलबजावणीयोग्य हक्क आहे. कोणत्याही व्यावसायिक फायद्यासाठी किंवा उदरनिर्वाहाच्या हक्कासाठी या मूलभूत हक्काशी तडजोड केली जाऊ शकत नाही,'' असे न्यायालयाने आपल्या निकालात स्पष्ट केले आहे. चमन लाल विरुद्ध हिमाचल प्रदेश राज्य आणि इतर (सिव्हिल रिट याचिका क्रमांक १३९५८/२०२४) या प्रकरणात एका माजी सैनिकाने याचिका दाखल केली होती. त्यांच्या घराशेजारी पर्यावरणाचे आणि स्थापनेचे नियम धाब्यावर बसवून पोल्ट्री फार्म चालवला जात असल्याचा आरोप त्यांनी केला होता. या फार्ममुळे परिसरात दुर्गंधी, आरोग्याच्या समस्या आणि पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याचे त्यांचे म्हणणे होते. प्रतिवादीने ग्रामपंचायतीकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेऊन आणि नियमांनुसारच फार्म चालवत असल्याचा दावा केला होता. तसेच, फार्ममध्ये कधीही ५,००० पेक्षा जास्त पक्षी नसल्याचेही सांगितले होते.

न्यायालयाने प्रत्यक्ष पाहणी अहवालाचा संदर्भ देत नमूद केले की, पोल्ट्री फार्म निवासी घरांपासून पुढच्या बाजूने केवळ ५० मीटर आणि मागच्या बाजूने २०-३० मीटर अंतरावर आहे आणि सध्या तिथे ६००० पक्षी पाळले जात आहेत. याशिवाय, प्रदूषण-नियंत्रण यंत्रणेचा अभाव आणि मृत पक्ष्यांची विल्हेवाट लावण्यासाठी खड्डे नसल्याचेही अहवालात म्हटले होते. पक्ष्यांच्या संख्येनुसार नियम बदलतात हा प्रतिवादीचा युक्तिवाद न्यायालयाने फेटाळून लावला. ''पोल्ट्री फार्म लहान असो वा मोठा, तो निवासी क्षेत्रापासून ५०० मीटर दूरच असला पाहिजे, जेणेकरून दुर्गंधी किंवा इतर कोणत्याही प्रकारचा धोका नागरिकांना होणार नाही,'' असे न्यायालयाने स्पष्ट करत याचिका मंजूर केली आणि फार्म बंद करण्याचे निर्देश दिले. या निकालावर भाष्य करताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी म्हटले आहे की, ''हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचा हा निर्णय नागरिकांच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देणारा असून, अत्यंत स्वागतार्ह आहे. व्यावसायिक हितसंबंधांपेक्षा नागरिकांचे जीवन आणि आरोग्य अधिक महत्त्वाचे आहे, हा संदेश या निकालाने दिला आहे. या निकालातून महाराष्ट्र सरकारने, विशेषतः जालनासारख्या वेगाने वाढणाऱ्या शहरांच्या प्रशासनाने, गंभीर बोध घेण्याची गरज आहे. अनेक शहरांमध्ये आणि ग्रामीण भागातही निवासी वस्त्यांच्या अगदी जवळ, नियमांचे उल्लंघन करून पोल्ट्री फार्म आणि तत्सम व्यवसाय चालवले जातात, ज्यामुळे नागरिकांना दुर्गंधी आणि आरोग्य समस्यांचा सामना करावा लागतो.'' ॲड. धन्नावत पुढे म्हणाले, ''जालना आणि महाराष्ट्रातील इतर शहरांमध्ये ग्रामपंचायत आणि नगरपालिकांनी अशा प्रकरणांमध्ये अधिक कठोर भूमिका घेतली पाहिजे. केवळ ना-हरकत प्रमाणपत्र देणे पुरेसे नाही, तर त्या व्यवसायामुळे नागरिकांच्या आरोग्यावर काय परिणाम होईल, याचाही विचार करणे बंधनकारक आहे. हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाप्रमाणे, आपल्या राज्यातील प्रशासनानेही कोणत्याही दबावाला बळी न पडता, निवासी क्षेत्राजवळ चालणाऱ्या अशा बेकायदेशीर व्यवसायांवर कठोर कारवाई करावी. नागरिकांच्या तक्रारीची वाट न पाहता, प्रशासनाने स्वतःहून सर्वेक्षण करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे, तरच नागरिकांना स्वच्छ आणि निरोगी पर्यावरणात जगण्याचा त्यांचा घटनात्मक अधिकार खऱ्या अर्थाने मिळेल.''

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.